# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दिनांक २१/११/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या १३१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. आमदार श्री. के.बी. नागरे | सभापती, |
| २. मा. श्री.के.बी. गवळी | मुख्य अधिकारी तथा उपसभापती |
| ३. मा. श्री.बबनराव देशमुख | सदस्य |
| ४. मा. श्री. राजेश्वर चव्हाण | सदस्य |
| ५. मा. ॲड. श्री. जे.पी. पाटील | सदस्य |
| ६. मा. श्री.मकरंद सावे | सदस्य |
| ७. मा.श्री. विश्वास उपासे | सदस्य |
| ८. मा. सौ. शैलजा गायकवाड | सदस्या |
| ९. मा. श्री. साहेबराव खरात | सदस्य |
| १०.मा. श्री. संजय वाधचौरे | सदस्य |
| ११.मा. श्री. वामनराव राऊत | सदस्य |
| १२.मा. श्री. सिकंदर अली कार्यकारी अभियंता, मनपा | सदस्य प्रतिनिधी |
| १३. मा. श्री. आर.एम. पालीमकर सहा. नगररचनाकार, औरंगाबाद | सदस्य प्रतिनिधी |

बैठकीचे कामकाज सुरु होण्यापुर्वी मा. मुख्याधिकारी यांनी मा. सदस्यांना माहिती दिली की, मंडळाचे मा. सदस्य डॉ. श्री. डी.डी. शिंदे यांच्या मातोश्रींचे दु:खद निधन झाले आहे. त्यामुळे सभागृहात दोन मिनिट स्तब्धता पाळुन मा. डॉ. श्री. शिंदे सदस्य यांचे मातोश्रींना श्रध्दांजली वाहण्यांत यावी असा प्रस्ताव मा. मुख्य अधिकारी यांनी मांडला व त्यास मा. सदस्य श्री. मकंरद सावे यांनी अनुमोदन दिले. त्याप्रमाणे सभागृहामध्ये दोन मिनिट उभे राहुन स्तब्धता पाळण्यांत येऊन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली व त्यानंतर मंडळाच्या पटलावरील विषयानुसार बैठकीच्या कामकाजास सुरुवात झाली.

## विषय क्र. १ : दिनांक २२/१०/२००३ रोजी झालेल्या मंडळाच्या १३० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

दिनांक २२/१०/२००३ रोजी झालेल्या मंडळाच्या १३० व्या बैठकीच्या कार्यवृत्तांता विषयी सविस्तर माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली. बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याच्या चर्चेच्या अनुषंगाने व सदर बैठकीतील ठराव क्र. ७७४ अन्वये घेतलेल्या ठरावानुसार मा. सभापती व सर्व मा. सदस्य यांनी विचारणा केली की, गृहनिर्माण भवनाजवळील मंडळाच्या कार्यालयाजवळील इमारत क्रमांक १ मधील पहिल्या मजल्यावरील २ हॉल्स भाडे तत्वावर देणेसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी प्रथम क्रमांकाचे व दुसऱ्या क्रमांकाचे निविदाधारक अनुक्रमे संजीवनी विदया प्रसारक मंडळ, नाशिक व महानायक पब्लीकेशन लि. औरंगाबाद हे त्यांचे जागेचे वापराबाबत म्हणणे मंडळासमोर सांगण्यासाठी उपस्थित आहेत काय अशी विचारणा केली. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, फक्त प्रथम क्रमांकाचे निविदाधारक संजीवनी विदया प्रसारक मंडळ नाशिकचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व त्यांनाच मंडळासमोर बोलविले असता त्यांनी जागेचे वापराबद्यल सांगितले की, त्यांची शैक्षणिक संस्था आहे व संस्थेच्या कार्यालयासाठी जागा त्यांना भाडयाने लागणार आहे व सदर जागेत ते विदयार्थ्यांना अभ्यासक्रमा विषयी मार्गदर्शन देखील केले जाणार आहे. याबाबतीत जागेच्या वापराबाबत सदर शिक्षण संस्थेस पत्र देऊन विचारणा केली असता त्यांनी पत्राद्वारे मंडळास लेखी कळविले आहे की, सदर जागेचा / हॉल्सचा वापर कार्यालयासाठी व मुलामुलींना अभ्यासक्रमा विषयी मार्गदर्शन करण्यासाठीच करणार आहेत. याबाबत मा. सभापती व सर्व मा. सदस्य यांनी मत व्यक्त केले की, उपरोक्त शिक्षण संस्था सदर हॉल्सचा वापर कार्यालयासाठी करणार नाहीत व शैक्षणिक कामासाठी करणार आहेत असे दिसते, म्हणून जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे फक्त कार्यालयासाठीच हॉल्सचा वापर करणे आवश्यक असल्यामुळे

सदर शिक्षण संस्थेस जागा भाडयाने जाहिरातीस अनुसरुन देणे योग्य होणार नाही. त्यामुळे त्यांची निविदा रद्द करावी. मा. सभापती यांनी असेही मत व्यक्त केले की, मंडळाची जागा / हॉल्स भाडयाने देण्यापेक्षा ते एकरक्कमी पध्दतीने जर कार्यालयीन कामासाठीच विक्री केले तर मंडळास जास्त फायदा होईल व हे योग्य ठरेल. म्हणुन सदर निविदा रद्द करण्यात याव्यात.

वरील प्रमाणे चर्चा केल्यानंतर मा. सभापती व सर्व सदस्य यांनी सुचीत केले की, मंडळाची जागा ही भाडयाने देऊ नये व ती एक रक्कमी पध्दतीवर विक्री करण्याची कार्यवाही करावी व तसेच संबंधीत दोन्ही निविदाकारांना कळविण्यात यावे.

उपरोक्त प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मंडळाने दिनांक २२/१०/२००३ रोजी झालेल्या १३० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते मान्य केला व निर्णय घेतला की,

**ठराव क्र. ७७७**

**दिनांक २२/१०/२००३ रोजी झालेल्या मंडळाच्या १३० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत उपरोक्त चर्चेसह कायम करण्यांत आला.**

## विषय क्र. २. : राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत अंबेजोगाई येथील घोषित झोपडपटटयातील सामाजिक सुविधा अंतर्गत कबीरनगर / रायगडनगर / रविवार पेठ / परळी वेस येथे सांस्कतिक सभागृह व आरोग्य केंद्र बांधण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

या विषयाबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, राष्ट्रीय झोपडपटटी सुधार योजने अंतर्गत अंबेजोगाई येथे सांस्कृतिक सभागृह व आरोग्य केंद्र बांधण्यासाठी एकुण ११ घोषीत झोपडपटटयांमधील १९९१ ची लोकसंख्या विचारात घेऊन (बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे व त्यासोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे) उपरोक्त सामाजिक सुविधा पुरविण्यासाठी जसे की, सांस्कृतिक केंद्र व आरोग्य केंद्र, बांधण्यासाठी एकुण रु. १९,९०,६८४/- एवढया रक्कमेचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी मंडळाकडे सादर केलेले आहे. मुख्य अधिकारी यांनी अशीही माहिती दिली की, सामाजिक सुविधा अंतर्गत कामे हि नजिकच्या ११ झोपडपटटीमधील एकत्रितरित्या लोकसंख्या विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता प्रस्ताव सादर केला असल्याने व शासनाचे गृहनिर्माण विभागाने सदर प्रस्तावास मान्यता दिली असल्याने अशा प्रस्तावांना बाब टिप्पणीत नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या आधारे प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार हे विभागीय मंडळास आहेत त्यामुळे नगरपरिषदेने उक्त कामासाठी रुपये १९,९०,६८४/- एवढया रक्कमेचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेकरिता सादर केले आहेत पैकी प्रशासकीय मान्यतेकरिता रुपये १९,०२,३१४/- एवढी रक्कम पात्र ठरते. त्यापैकी शासनाच्या निर्देशाप्रमाणे रुपये दरडोई २०० पैकी १२० प्रमाणे रुपये ११,४१,३८८/- च्या हद्दीपर्यन्तची रक्कम निधीच्या दरडोई २०० पैकी १२० प्रमाणे उपलब्धतेनुसार प्रतिपर्तीसाठी पात्र राहील. विषयांकीत प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार मंडळास असल्याने बाब टिप्पणी विचारार्थ व निर्णयास्तव मंडळासमोर सादर केली आहे.

याबाबत मंडळाने सर्वानुमते प्रतिपादन केले की, बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटीच्या अधिन राहुन बाब टिप्पणीत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे व नगर परिषद अंबेजोगाई कडुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पर्तता करुन घेऊन प्रस्तावित सांस्कतिक सभागृह व आरोग्य केंद्र बांधण्याच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत यावी.

उपरोक्त चर्चेअंती मंडळाने निर्णय घेतला की,

**ठराव क्र. ७७८**

**राष्ट्रीय झोपडपटटी सुधार कार्यक्रमान्तर्गत अंबेजोगाई येथील ११ झोपडपटटीतील लोकसंख्या विचारात घेऊन विविध ठिकाणी सांस्कृतिक सभागृह व आरोग्य केंद्र बांधण्याच्या अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १९९०६८४/- पैकी रुपये १९०२३१४/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटींच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करेण्यांत येत आहे. शासनाच्या निर्देशाप्रमाणे दरडोई २०० पैकी १२० प्रमाणे येणारी रक्कम रुपये ११४१३८८/- प्रतिपर्तीस पात्र राहील व आवश्यक कागदपत्राची पुर्तता झाल्यानंतरच प्रशासकीय मान्यतेचे आदेश पारीत करण्यांत यावे. स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.**

**विषय क्र. ३:- राष्ट्रीय झोपडपटटी सुधार योजने अंतर्गत उस्मानाबाद येथील घोषित झोपडपटटीतील कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

या बाब टिप्पणी विषयी मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, राष्ट्रीय झोपडपटटी सुधारणा कार्यक्रमान्तर्गत उस्मानाबाद नगर परिषदेने शासनाच्या दिनांक १/१०/९९ च्या निर्णयानुसार उस्मानाबाद शहरातील एकुण ७ झोपडपटटयांमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्यासाठीचे रुपये ६७.७९ लक्ष रुपयाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी मंडळाकडे सादर केले आहे. शासनाच्या मानकाप्रमाणे व सन १९९१ च्या लोकसंख्ये प्रमाणे उस्मानाबाद नगरपरिषदेने सादर केलेली अंदाजपत्रके तपासली असता अंदाजपत्रकीय रक्कमेपैकी म्हणजे रुपये ६७.७९ लक्ष रुपयापैकी रुपये ६७.१७ एवढी रक्कम प्रशासकीय मान्यतेस पात्र ठरते अशी माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली. शासनाच्या दिनांक १/१०/९९ च्या शासन निर्णयानुसार मुलभूत सुविधाच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार हे विभागीय मंडळास आहेत. त्यामुळे प्रस्तुत बाब टिप्पणी मंडळाच्या विचारार्थ व निर्णयास्तव सादर केली आहे.

याबाबत मंडळाने सर्वानुमते प्रतिपादन केले की, बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटीच्या अधिन राहुन बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आर्थिक तरतुदीच्या उपलब्धतेनुसार व उस्मानाबाद नगरपरिषदेकडुन आवश्यक त्या कागदपत्राची पर्तता करुन घेऊन एकुण ७ घोषित झोपडपटटीत मुलभुत सुविधा पुरविण्याच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यंत यावी.

उपरोक्त चर्चेअंती मंडळाने निर्णय घेतला की,

**ठराव क्र. ७७९**

**राष्ट्रीय झोपउपटटी सुधार कार्यक्रमान्तर्गत उस्मानाबाद येथील ७ घोषित झोपडपटटयामध्ये (परिशिष्ट 'अ' प्रमाणे )व बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुलभूत सुविधा पुरविण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकापैकी रक्कम रुपये ६७.७९ लक्ष पैकी रुपये ६७.१७ लक्ष एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे. आवश्यक कागदपत्राची पर्तता झाल्यानंतर प्रशासकीय मान्यता आदेश पारीत करण्यांत यावेत. स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.**

## मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांच्या परवानगीने येणारे आयत्यावेळचे विषय.

**विषय क्र. : १ : सर्वे क्र. ९७(भाग), ९८(भाग) बाभुळगांवरोड लातुर येथील प्राथमिक शाळेसाठीच्या राखीव भूखंडाबाबत. निविदा संबंधी निर्णय घेणेबाबत.**

या विषयाबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, सर्वे क्र. ९७ (भाग), ९८(भाग) बाभुळगांवरोड लातुर येथे प्राथमिक शाळेसाठी २ भूखंड राखीव आहेत. सदर भूखंड शाळेसाठीच्या वापरासाठी वाटप करण्यासाठी जहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापी भूखंड क्र. १ साठी (क्षेत्र १000 चौ.मी.) एकच निविदा प्राप्त झाली. सदर निविदा श्री. दत्तात्रय गोविंद वाघमारे, अध्यक्ष, मालतीदत्त शिक्षण संस्था मु. कौठा (ला) पाटी, जि. लातूर यांनी भरली आहे. सदर निविदा मंडळाने ठरविलेल्या दरापेक्षा जास्त आहे असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले. तथापी विभागीय लेखापाल यांनी आता निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे असे अनिवासी भूखंड वाटप करण्यासाठी प्राधिकरणाने ठरवुन दिलेल्या धोरण व मार्गदर्शक सुचनेचे अवलंब करणे भाग आहे. सदर धोरणानुसार व मार्गदर्शक सुचनानुसार उपरोक्तप्रमाणे शाळेसाठीच्या राखीव भूखंडासाठी निविदा मागविणे अभिप्रेत नसुन फक्त सोसायटी पंजीकृत कायदा १८६० अथवा पब्लीक ट्रस्ट कायदा १९५० नुसार पंजीकृत असलेल्या संस्थेकडुन मंडळाने जाहीरात देऊन विहित केलेल्या फॉर्म 'ए' मध्येच अर्ज मागविणे आवश्यक होते अशा प्रकरणी विशिष्ट तक्त्यामध्ये शिक्षण उपसंचालकाचे अभिप्राय मागविणे क्रमःप्राप्त आहे अशी सर्व कारवाई झाल्या नंतर प्राप्त झालेले अर्ज मंडळासमोर विहित नमुन्यात सादर करुन त्याप्रमाणे भूखंड वाटपाची कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. प्रस्तुत

प्रकरणी भूखंड वाटपसाठी निविदा मागविल्या आहेत व त्यामुळे प्राधिकरणाने ठरवुन दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार कार्यवाही झालेली नसल्याचे निदर्शनास आल्या नंतर व तसेच विहित पध्दत न अवलंबिल्यामुळे भूखंडास मोठया प्रमाणात मागणी मिळाली नसल्याचे दिसुन आले. उपरोक्त प्रमाणे नमुद केल्यानुसार जी निविदा प्राप्त झाली आहे. (मालतीदत्त शिक्षण संस्था याची निविदा) ती रद्य करुन प्राधिकरणाच्या धोरणानुसार व मार्गदर्शक सुचनानुसार जाहिरात देऊन पुढील कार्यवाहीस मंजूरी देणेसाठीचे बाब टिप्पणी मंडळाच्या विचारार्थ व निर्णयास्तव सादर केले आहे असे मुख्य अधिकरी यानी सांगितले.

याबाबत मंडळाने सर्वानुमते प्रतिपादन केले की, बाब टिप्पणीत नमुद केलेली माहिती व मुख्य अधिकारी यांनी विषद केलेली माहिती विचारात घेता प्राधिकरणाच्या धोरणानुसार व मार्गदर्शक सुचनानुसार प्राथमिक शाळेच्या भूखंडाचे वाटप करण्याची कार्यवाही करणे व त्यासाठीची पध्दत अवलंबिणे बंधनकारक असल्यामुळे व प्रस्तुत प्रकरणी ठरवुन दिलेल्या पध्दतीत बदल झालेला असल्यामुळे उपरोक्त संस्थेची एकमेव प्राप्त झालेली निविदा रद्द करण्यात यावी व तसे सदर संस्थेस कळविण्यंत यावे- मंडळाने सर्वानुमते असेही सांगितले की, उपरोक्त २ भूखंड वाटपाची कार्यवाही प्राधिकरणाचे धोरण व मार्गदर्शक तत्वानुसारच विनाविलंब करण्यांत यावी.

वरील प्रमाणे सविस्तर चर्चेअंती मंडळाने एकमताने निर्णय घेतला की,

ठराव क्र. ७८०

**श्री. दत्तात्रय गोविंदराव वाघमारे, अध्यक्ष, मालतीदत्त शिक्षण संस्था मु. कौठा (ला) पाटी, जि. लातूर यांची एकमेव प्राप्त झालेली निविदा रद्द करण्यात यावी व त्याप्रमाणे सदर शिक्षण संस्थेस कळविण्यांत यावे व प्राथमिक शाळेसाठी २ भूखंडाचे वाटप करण्याची कार्यवाही प्राधिकरणाच्या धोरण व मार्गदर्शक सुचनानुसार करावी.**

**विषय क्र. २ : देवळाई जि. औरंगाबाद येथील गट क्र. ७४ (भाग) क्षेत्र ७.४६ हेक्टर जमिनीच्या सुरक्षाबाबत.**

सदर विषयाच्या बाब टिप्पणीबाबत कार्यकारी अभियंता श्री. एस.डी.पांडे यांनी मंडळास माहिती दिली की, देवळाई येथे नव्याने ताब्यात आलेल्या शासकीय जमिनीवर पुर्व अतिक्रमण होते ते काढुन सदर जमिन मंडळाचे ताब्यात शासनाने दिली आहे. सदर अतिक्रमण हटविण्यासाठी मंडळास रुपये ७७५०/- इतका खर्च करावा लागला तसेच या जमिनीवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये म्हणून दिनांक २३/९/२००३ ते १०/११/२००३ या काळात मेडीयेटर्स ॲण्ड अजिंठा सेक्युरिटी प्रा. लि. यांच्यातर्फे ३ सुरक्षा गार्ड प्रतिपाळी याप्रमाणे ३ पाळयात सुरक्षा गार्ड व रिलीव्हींग १.५ पाळी अशा एकंदरीत १०.५ चौकीदारांची सेवा घेण्यात आली.त्यासाठी रुपये १०,७५०/-एवढा खर्च सुरक्षा व्यवस्थेसाठी करण्यांत आलेला आहे . तसेच यानंतरही उपरोक्त जमिनीवर अतिक्रमण व अनाधिकृत ताबा होऊ नये म्हणून ११/११/०३ पासून प्रत्येक पाळीत फक्त १ सुरक्षा गार्ड तैनात करण्यांत आला आहे. सदर जमिनीवर मंडळाची योजना कार्यान्वीत होईपर्यन्त तेथे सुरक्षा व्यवस्था तैनात ठेवणे भाग आहे म्हणून प्रस्तुत प्रकरणी झालेला खर्च रु ७७५०/- व रुपये १०७५०/- एवढया खर्चास कार्योत्तर मंजूरीसाठी व दिनांक ११/११/२००३ पासुन ते उक्त जमिनीवर मंडळाची योजना कार्यान्वीत होईपर्यन्त प्रत्येक पाळीत फक्त १ सुरक्षा गार्ड तैनात करण्यासाठी मंजूरी देण्यासाठीची बाब मंडळाच्या विचारार्थ व निर्णयास्तव सादर केली आहे.

याबाबत मंडळाने सर्वानुमते प्रतिपादन केले की, मंडळाच्या जमिनीचे संरक्षण करणे हे अतिमहत्वाची बाब असल्यमुळे उपरोक्त प्रस्तावित केल्याप्रमाणे झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्यांत येत असुन तसेच मंडळाची योजना सदर जमिनीवर कार्यान्वत होईपर्यन्त उपरोक्त प्रस्तावित जमिनीचे रक्षण करण्यासाठी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

वरीलप्रमाणे चर्चेअंती उपरोक्त विषयावर मंडळाने निर्णय घेतला की,

ठराव क्र. ७८१

**देवळाई ता. जि.औरंगाबाद येथील शासकीय जमिन गट क्र ७४ (भाग )क्षेत्र ७.४६ हे जमिन ताब्यात घेतांना त्यावर असलेले अतिक्रमण काढण्यासाठी झालेला खर्च रुपये ७७५०/- व दिनांक २३/९/२००३ ते १०/११/२००३ या कालावधीपर्यन्त सदर जमिनीच्या**

संरक्षणासाठी मेडीयटर्स ॲण्ड अजिंठा सेक्युरिटीस सर्व्हीसेस यांच्याकडुन नेमण्यात आलेल्या गार्डसच्या खर्चापोटी रु १०७५०/- एवढया खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे आणि दिनाक ११/११/२००३ पासून ते मंडळाची योजना कार्यान्वत होईपर्यन्त प्रत्येक पाळीत फक्त १ सुरक्षा गार्ड (कार्यालयीन इमारतीच्या मंजूर दरान) तैनात करण्यासाठी मंजूरी प्रदान करण्यांत येत आहे.

**विषय क्र. ३ : मुकूंदवाडी स. क्र. ७/१,७/२ येथील व्यापारी तथा रहिवाशी भूखंडाच्या सुरक्षा व्यवस्थाबाबत.**

या विषयाबाबत कार्यकारी अभियंता श्री. एस.डी .पांडे यांनी माहिती दिली की, औरंगाबाद मुकूंदवाडी येथील जालनारोड लगत मोक्याच्या ठिकाणी मंडळाचे रहिवाशी/व्यापारी भूखंड रिक्त आहेत. सदर भूखंड वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या भूखंडावर अतिक्रमणे होऊ नयेत म्हणून भूखंडाचे रक्षण करण्यासाठी मे . मेडियटर्स ॲण्ड अजिंठा सेक्युरिटी सर्व्हीसेस प्रा. लि.औरंगाबाद मार्फत दरमहा रुपये ७७५९/- या दराने सुरक्षा सेवा घेण्यात आली आहे. सदर सुरक्षा व्यवस्था दिनांक ३१/३/२००३ पर्यन्त चालु ठेवण्यास मंडळाने यापुर्वीच मंजूरी दिली आहे. अद्याप सदर भूखंडाचे वाटप न होऊ शकल्याने या भूखंडाची किंमत,स्थान व महत्व विचारात घेता तेथे अतिक्रमण होऊ न देणे व त्याचे रक्षण करणे अत्यावश्यक आहे . त्यामुळे दिनांक १/४/२००३ ते ३१/३/२००४ या कालावधीपर्यन्त किंवा सदरहु भूखंड वाटप होईपर्यन्त यापैकी जो कालावधी अगोदर समाप्त होईल त्या कालावधीपर्यन्त उपरोक्त भूखंडाचे रक्षण करण्यासाठी सुरक्षा व्यवस्था चालु ठेण्यासाठी व त्यासाठी रुपये ७७५९/-प्रमाणे येणाऱ्या दरमहा खर्चास मंडळाची मंजरी मिळणेसाठी प्रस्तुत बाब टिप्पणी मंडळाचे कार्योत्तर मंजूरीसाठी व पुढील कालावधीसाठीच्या खर्चास मंजूरीसाठी सादर केली आहे अशीही माहिती कार्यकारी अभियंता औरंगाबाद विभाग यांनी दिली.

याबाबत मंडळाने सर्वानुमते प्रतिपादन केले की, मंडळाच्या रिक्त भूखंडाचे/जमिनीचे संरक्षण करणे ही बाब अतिमहत्वाची असल्यमुळे उपरोक्त प्रस्तावित केल्यापमाणे सुरक्षा व्यवस्था ठेवण्यासाठी केलेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत असुन पुढील कालावधी म्हणजे दिनांक ३१/३/२००४ पर्यन्त किंवा सदरहु भूखंड वाटप होईपर्यन्त यापैकी जो कालावधी अगोदर समाप्त होईल त्या कालावधी पर्यन्त सुरक्षा व्यवस्था चालु ठेण्यासाठीची मंजूरी देण्यांत येत आहे .

उपरोक्त प्रमाणे चर्चेअंती मंडळाने निर्णय घेतला की,

**ठराव क्र. ७८२**

मुकूंदवाडी औरंगाबाद येथील स. क्र. ७/१, ७/२ येथील व्यापारी तथा रहिवाशी भूखंडाच्या सुरक्षा व्यवस्थे बाबत बाब टिप्पणीत नमुद केल्यानुसार झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे तसेच १/४/०३ ते ३१/३/२००४ पर्यन्त किंवा सदर भूखंड वाटप होईपर्यन्त यापैकी जो कालावधी अगोदर समाप्त होईल त्या कालावधीपर्यन्त सुरक्षा व्यवस्था चालु ठेवण्यासाठी मंजूरी देण्यांत येत आहे.

**विषय क्र. ४: राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमान्तर्गत गट क्र १६३ भाग बोरी ता. जिंतुर जि.परभणी येथे अत्यल्प उत्पन्न गटातील १६६ गाळे बांधणे.**

**योजना पर्णत्वाबाबतचा अंतरीम अहवाल.**

सदर विषयाबाबत कार्यकारी अभियंता यांनी मंडळास माहिती दिली. विषयाधीन योजनेबाबतची माहिती देतांना कार्यकारी अभियंता, औरंगाबाद विभाग यांनी असे नमुद केले की, विधयाधीन योजनेचे बांधकाम प्रगतीपथावर असुन माहे डिसेंबर २००३ पर्यन्तपुर्ण होणे अपेक्षित आहे. या योजनेतील भावी लाभार्थीनी गाळयांच्या आतील बाजुस पाईटींग ऐवजी प्लाटर व मुरुम फ्लोअरींग ऐवजी शहाबाद फरशी या सुविधा दयाव्यात अशी विनंती केली आहे व त्यासाठीच्या खर्चाचा भार ते सोसावयास तयार आहेत. तसेच याबाबत कार्यकारी अभियंता यांनी असेही नमुद केले की, मुळ प्रस्तावाप्रमाणे सदर योजनेस शासनाच्या विविध विभागामार्फत बाहयसुविधा पुरविण्यांत येणार होत्या. संबंधीत विभागाकडे कार्यकारी अभियंता यांनी पाठपुरावा केला. तथापी योजनेतील गाळे पुर्ण होतानाच बाहयसुविधांची कामे पुर्ण होण्याबाबत शंका आहे. त्यामुळे गाळेवाटपास विलंब होईल यासाठी बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे पर्याय सादर केले आहेत.

यावर मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी उपरोक्त प्रमाणे सुविधा पुरविल्यास व योजनेस लागणाऱ्या किमान बाहय सुविधांची कामे मंडळाने केल्यास गाळयांची किंमत किती येते याबाबत विचारणा केली. त्यावर कार्यकारी अभियंता, औरंगाबाद विभाग यांनी अशी माहिती दिली की, मुळ जाहिरातीप्रमाणे गाळयांची किंमत रुपये ३९५००/- एवढी हाती व सुधारीत विक्री किंमत रुपये ४८५०७/- एवढी येते व प्रशासकीय मान्यतेप्रमाणे प्रति गाळा किंमत रुपये ४१४६०/- एवढी येते व येणारी वाढ जवळपास १०,०००/-एवढी आहे व ही रक्कम प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार गाळा ताब्यात घेण्यापुर्वी वसुल करावी लागणार आहे.

यावर मंडळाचे सदस्य मा. श्री. मकरंद सावे यांनी असे मत मांडले की, आर्थिक दृष्टया दुर्बल घटकासाठी असणाऱ्या या योजनेतील वाढ ही, आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लोकांच्या आवाक्याबाहेरची आहे. सबब बाब टिप्पणीमध्ये वाढीव रकमेपैकी ५० टक्के रक्कम कर्ज रुपाने व ५० टक्के रक्कम लाभार्थींनी भरावेत असा प्रस्ताव दिला आहे. त्याएवेजी प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांकरिताच्या योजनेस ८० टक्के कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. याप्रमाणे या योजनेसही ८० टक्के कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे.

याबाबत कार्यकारी अभियंता, औरंगाबाद विभाग यांनी खुलासा केला की, म्हाडाने यापुर्वी रु. ३८५००/- किंमतीच्या गाळयांसाठी रु. ३४०००/- म्हणजे ८६ टक्के कर्ज प्राधिकरण निधीतुन उपलब्ध करुन दिले आहे व आता प्राधिकरणाकडुन सुधारीत मंजूरी घ्यावी लागेल.

यावर मा. सदस्य श्री. सावे यांनी असे मत प्रदर्शित केले की, सदरची योजना ही म्हाडाची ग्रामीण भागातील पहिलीच योजना आहे व वाढीव किंमत ही जास्त असल्याने, लाभार्थीकडुन प्रतिसाद मिळणार नाही. सबब अशा कारणामुळे म्हडाची प्रतिमा मलीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाढीव किंमत व प्रशासकीय मान्यते प्रमाणे येणारी किंमत यात जास्त फरक नसल्याने, सुरक्षिततेचा उपाय म्हणुन प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीच्या म्हणजे रुपये ४१४६०/- च्या ८० टक्के कर्ज उपलब्धीबाबत म्हडाची मंजूरी घ्यावी. तसेच असेही प्रस्तावित केले की, बाहयसुविधांच्या उपलब्धीबाबत मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना मा. सभापतीचे स्वाक्षरीने अ. शा. पत्र लिहुन विनंती करावी. तसेच लाभार्थींच्या मागणीनुसार अतिरिक्त सुविधा पुरवाव्यात. तसेच शासनाच्या विविध योजनांमधुन बाहयसुविधा न पुरविल्या गेल्यास, मंडळामार्फत किमान बाहयसुविधा पुरविण्यांत याव्यात, जेणे करुन गाळे वाटपास होणारा विलंब टळेल. यास मंडळाचे सर्व मा. सदस्यांनी सहमती दर्शविली व एकमताने निर्णय घेतला की,

**ठराव क्र. ७८३**

१. योजनेस बाहयसुविधा पुरविणेबाबत मा. विभागीय आयुक्त यांना मा. सभापतींचे स्वाक्षरीने अ. शा. पत्र लिहुन विनंती करण्यांत यावी.

२. लाभार्थींच्या मागणीनुसार गाळयांच्या आतील बाजुस पाईटींग व मुरुम फ्लोरींग ऐवजी शहाबाद फरशी या अतिरिक्त सुविधा पुरविण्यात याव्यात.

३. प्रशासकीय मान्यता प्राप्त गाळयांची किंमत रुपये ४१,४६०/- च्या ८० टक्के कर्ज प्राधिकरण निधीतुन उपलब्ध करुन देण्याबाबत प्राधिकरणास प्रस्ताव पाठविण्यात यावा व उर्वरीत रक्कम लाभार्थींकडून घ्यावी.

४. शासनाच्या विविध विभागांकडुन योजनेस बाहयुसविधा न पुरविल्या गेल्यास मंडळामार्फत किमान बाहयसुविधा पुरविणे विषयी त्वरीत कार्यवाही करुन गळे वाटपामधील संभाव्य विलंब टाळणेबाबत कार्यवाही करावी.

**विषय क्र. ५: राष्ट्रीय झोपडपट्टी सुधारणा योजने अंतर्गत लातूर येथील नव्याने ३५ घोषित झोपडपटटयातील कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

मुख्याधिकारी नगरपरिषद, लातूर यांनी लातूर येथे दिनांक १८/९/२००३ च्या राजपत्रान्वये एकुण ३५ नविन झोपडपटटया घोषित केल्या आहेत.सदर ३५ झोपडपटटयांमध्ये राष्ट्रीय झोपडपटटी सुधारणा कार्यक्रमान्तर्गत मुलभूत सुविधा पुरविण्यासाठीचे एकुण ५५९.०० लक्ष एवढया रक्कमेची अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेस्तव दिनांक २१/११/२००३ रोजी सादर केली आहेत.

मा. मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सदर प्रस्तावाबाबत असे प्रतिपादन केले की, मुख्य अधिकारी नगरपरिषद लातुर यांनी सादर केलेले प्रस्ताव वेळे अभावी छाननी करता आलेले नाही. जसे की, पुर्वी घोषित केलेल्या झोपडपटटया व आताच्या नव्याने घोषित झोपडपटटयाचे सीमाकंन, लातुर शहराच्या एकुण लोकसंख्येच्या तुलनेत घोषित झोपडपटटयांची एकुण लोकसंख्या,महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या आर्थिक तरतुदी इत्यादी बाबी .करिता सदर बाब छाननीअंती पुढील बैठकीत ठेवण्याचे प्रस्तावित केले.

यावर मंडळाचे सदस्य मा. श्री. मकरंद सावे यांनी असे प्रतिपादन केले की, लातूर शहरातील एकुण घोषित झोपडपटटयांची लोकसंख्या व इतर बाबी छाननी अंती जी कांही रक्कम येईल त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करावी.यावर मा. सभापती व इतर सदस्य यांनी सहमती दर्शविली व निर्णय घेतला की,

**ठराव क्र : ७८४**

**लातूर नगरपरिषदेने सादर केलेले प्रस्ताव चर्चेत ठरल्याप्रमाणे संपूर्ण छाननी अंती जी कांही रक्कम पात्र ठरेल त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.**

## विषय क्र. ६ : ग्रामीण भागात आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी योजना हाती घेतांना लाभधारकाकडुन अर्जासोबत रुपये ५००/- व गाळा ताब्यात देतांना रुपये ५००/- एवढी अनामत रक्कम स्विकारणेबाबत.

मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, ग्रामीण भागातआर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी योजना राबवितांना ठोस मागणी अजमावितांना लाभधारकांडुन गाळयांच्या किंमतीच्या १० टक्के व घराचा ताबा देतांना १० टक्के अनामत रक्कमेची मागणी मंडळाकडुन करण्यांत येते.

ही अनामत रक्कम ग्रामीण भागातील जनतेसाठी खूप जास्त असुन त्यामुळे लोकांना घरांची आवश्यकता असुनही लोक मागणी नोंदवु शकत नाहीत. आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी योजना राबवितांना एक मासिक हप्त्या एवढी रक्कम अंदाजे रुपये ५००/-गाळयांची मागणी नोदवितांना व एक मासिक हप्त्याएवढी रक्कम अंदाजे रुपये ५००/- घराचा ताबा देतांना गाळेधारकांकडुन घेतल्यास उर्वरीत रक्कम १५ वर्षाच्या समान मासिक हप्त्याने वसुल केल्यास ग्रामीण भागातील गोरगरीब जनता म्हाडाची घरे घेऊ शकेल व बेघरांना निवारा मिळू शकेल. सदर सुचना अतिशय चांगली असल्याचे प्रतिपादन मंडळाचे मा. सदस्य श्री. राजेश्वर चव्हाण व श्री. मकरंद सावे यांनी केले व खरोखरच महाराष्ट्र राज्यात सर्वांना निवारा उपलब्ध करुन द्यावयाचा झाल्यास ही सुचना त्वरीत अंमलात आणावी अशी मागणी केली.

याबाबत सर्व मा. सदस्यांनी आग्रही प्रतिपादन केले व याबाबतचा ठराव पारीतकरुन प्राधिकरणाकडे मंजूरीस्तव पाठवावा असे ठरले. त्यानुसार सर्वानुमते ठराव संमत करण्यात आला की,

**ठराव क्र. ७८५**

**ग्रामीण भागात आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी योजना राबवितांना मागणी नोंदवितांना फक्त रुपये ५००/- एवढी अनामत रक्कम व गाळयांचा ताबा देतांना रुपये ५००/- एवढी रक्कम घेऊन गाळयाची उर्वरीत रक्कम समान मासिक हप्त्याद्वारे परत फेडीच्या अटीवर कर्जाद्वारे उपलब्ध करुन द्यावी व मराठवाडयातील जास्तीत जास्त बेघरांना निवारा उपलब्ध करुन देणेसाठी मंडळाच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राधिकरणास मंजूरीसाठी पाठविण्यांत यावा.**

## विषय क्र. ७ : वॅम्बे योजनेच्या धर्तीवर ग्रामीण भागासाठी गृहनिर्माण योजना हाती घेणेबाबत.

मा. सदस्यांनी चर्चेच्या अनुषंगाने मुद्या उपस्थित केला की, वाल्मीकी आंबेडकर आवास योजना ही अतिशय चांगली योजना असुन ती केवळ शहरी भागामध्येच राबविल्यामुळे ग्रामीण जनतेवर अन्याय होत आहे.

सदरहु योजनेच्या धर्तीवर ग्रामीण भागातही सध्या ज्या जागेवर कच्ची घरे उभी आहेत, तीच घरे पक्की करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने संयक्त योजना हाती घेतल्यास गोरगरीब जनतेला खुप फायदा होईल व अधिकाधिक लोकांना हक्काचा निवारा मिळु शकेल, करिता मंडळाच्या ठरावानुसार महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयास वाल्मीकी आंबेडकर

आवास योजनेच्या धर्तीवर ग्रामीण भागासाठी योजना हाती घेण्यांत यावी,करिता विनती करावी असे सुचविले.

या सुचनेस मंडळाचे सदस्य मा. विश्वास उपासे, मा. श्री. जे. पी. पाटील यांनी अनुमोदन दिले व सर्वानुमते ठराव संमत करण्यांत आला की,

**ठराव क्र. ७८६**

**शहरी भागात केंद्र व राज्य सरकारतर्फे राबविण्यांत येत असलेल्या वाल्मिकी आंबेडकर आवासयोजनेच्या धर्तीवर ग्रामीण भागात योजना सुरु करावी व सध्या आहे त्याच ठिकाणी कच्चा घराचे पक्क्या घरात रुपांतर करण्यासाठीचा कार्यक्रम केंद्र व राज्य सरकाने हाती घेऊन ग्रामीण भागात पक्का निवारा उपलब्ध करुन देणेसाठी मंडळाच्यावतीने राज्य सरकारला विनंती करण्यात यावी.**

**उपरोक्त प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर मा. सभापती यांचे परवानगीने मा. सदस्यांनी खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित केले.**

१. मंडळाचे मा.सदस्य ॲड श्री. जे. पी. पाटील यांनी सांगितले की, कौठा नांदेड येथील मंडळाच्या योजनेसाठी अंतर्गत रस्त्याचे काम झालेले नाही याबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, सदर रस्त्याचे काम जिल्हा परिषद नांदेडमार्फत करणे भाग आहेत. याबाबत जि.प. नादेडकडे पाठपुरावा करणेसाठी कार्यकारी अभियता लातूर यांना सूचना देण्यांत येतील.त्याचप्रमाणे मा.श्री.सदस्य श्री.पाटील यांनी असेही प्रतिपादन केले की, सदरील कौठा येथील योजनेतील बरेच गाळे जवळपास दोन वर्षापासुन रिक्त असुन त्या ठिकाणी या रिक्त गाळयांची मोडतोड तसेच कांही ठिकाणी अनाधिकृत घुसखोरी होत आहे. त्यामुळे सदर गाळयांचे वाटप होईपर्यन्त सुरक्षा व्यवस्था नेमणे आवश्यक आहे.
याबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, कौठा नांदेड येथील रिक्त गाळयाबरोबरच उदगीर व गेरावई येथील रिक्त गाळयांना सुरक्षा व्यवस्था नेमणेसाठीची परवानगी देणेबाबत प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करुन पाठपुरावा केलेला आहे. तथापी परवानगी न मिळाल्यामुळे अद्याप सुरक्षा व्यवस्था नियुक्त केलेली नाही. याबाबत पुन्हा पाठपुरावा करण्यांत येईल असे मा. मुख्य अधिकारी यांनी सांगितले.तथापी मा. सदस्य श्री. पाटील यांनी कौठा नांदेड येथील गाळयांचे पुढील नुकसान होऊ नये यासाठी सुरक्षा व्यवस्था करण्यांत यावी.यावर मा. सभापती व सर्व सन्माननीय सदस्यांनी सूचना केली की, कौठा नांदेड येथील रिक्त गाळयांचे सुरक्षेसाठी, विशेष बाब म्हणून रितसर कार्यवाही करुन प्राधिकरणाकडुन कार्योत्तर मंजूरी घ्यावी. त्याचप्रमाणे, गेवराई व उदगीर येथील गाळयांचे सदयस्थितीबाबत कार्यकारी अभियंता यांचेकडुन अहवाल मागवुन पुढील कार्यवाही करुन आगामी बैठकीत अहवाल सादर करावा.

२. शहानुरवाडी येथील उच्च उत्पन्न गट योजनांतील बंगल्याचे बांधकाम करणारे ठेकेदार मे. तान्य कन्स्ट्रक्शनस यांनी योजनेचे बांधकाम मुदतीत पुर्ण न केल्यामुळे त्याचेवर दंडात्मक कार्यवाही करावी. याबाबत कार्यकारी अभियंता यांनी माहिती दिली की, सदर ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही चालु आहे. यावर मंडळाचे सर्व मा. सदस्य यांनी सर्वानुमते सांगितले की, केवळ मे. तान्य कन्स्ट्रक्शनस या नावाच्या कंपनीला ब्लॅक लिस्ट करते वेळी सदर कंपनीचे भागीदार (पार्टनर) श्री. राहुल घोगरे, श्री.पालोदकर व श्री. पृथ्वीराज पाटील यांनाही ब्लॅक लिस्ट करावे व सदर व्यक्तींना यापुढे मंडळाचे कोणतेही बांधकाम देऊ नये.
याबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, सदर मे. तान्या कन्स्ट्रक्शनला किंवा त्यांचे उपराक्त भागीदारांना / पार्टनरला यापुढे मंडळाची कामे न देण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल.

३. मंडळाचे सदस्य श्री. मकरंद सावे यांनी प्रतिपादन केले की, मंडळांतर्गत प्रगतीपथावरील कामांची तपासणी प्राधिकरणाच्या दक्षताव गुण नियंत्रणामार्फत होते त्यावेळी मंडळाच्या सदस्यांना कल्पना नसते त्यामुळे गुणवत्ताबाबत कांही तक्रारी असल्यास त्यांचे निदर्शनास आणता येत नाही. करिता ज्या ज्या वेळी प्राधिकरणाचे अधिकारी तपाणीसाठी येतील त्या त्या वेळी स्थानिक सदस्यांना कल्पना द्यावी. यावर मा. सभापती यांनी सांगितले की,गुणवत्ता बाबतची सुचना असल्याने तसे प्राधिकरणास कळवावे. यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, तसे पत्र प्राधिकरणाकडे सादर करण्यांत येईल.

४. मा. सभापती यांनी सांगितले की, मंडळाच्या गृहनिर्माण योजना शहरी भागात (जिल्हा व तालुका स्तरावर) एमआयडीसी व एनटीसी च्या जमिनी उपलब्ध करून घेणेसाठी मंडळाचे अधिकारी यांनी प्रयत्न करावेत व त्याप्रमाणे जमिनी मिळविण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत.

५. मा. सदस्य श्री. बबनराव देशमुख यांनी बैठकीत सांगितले की, भोकरदन येथील योजनेतील गाळयाचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे आहे. त्यामुळे त्यांची तपासणी प्राधिकरणाच्या दक्षता व गुणनियंत्रण विभागाकडुन करण्यासाठी मंडळाचे वतीने कळवावे.
यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, मंडळाचे कार्यकारी अभियंता यांचेकडुन कामाच्या गुणवत्तेबाबत अहवाल मागविण्यात येईल व तसेच प्राधिकरणाच्या दक्षता व गुणनियंत्रण विभागास कळविण्यांत येईल.

६. मंडळाचे मा. सदस्य श्री. मकंरद सावे, ॲड श्री. पाटील व श्री.उपासे यांनी प्रतिपादन केले की, मंडळाचे सदस्य शहानुरवाडी येथील उच्च उत्पन्न गट योजनेतील गाळयाच्या बांधकामाची पहाणी करण्यास गेले होते,त्यावेळी मंडळाचे तत्कालीन कार्यकारी अभियंता,उपअभियता व शाखा अभियंता उपस्थित होते. या पहाणीच्या वेळी मंडळाचे सदस्य यांनी बांधकामात वापरण्यात येणारे साहित्य जसे की, वाळु,विटा,सिमेंट व कॉक्रीटींग स्लॅबचे नमुने घेण्यास व त्याची तपासणी करुन घेण्यास उपस्थित अभियेंते यांना सांगितले होते व नमुने गोळाही केले होते. परंतु सदर नमुने साईट वरील मंडळाचे अभियेंते यांनी कार्यालयात आणले नाहीत व त्याच तपासनीही केली नाही व केलेल्या कार्यवाहीची माहितीही मा. सदस्यांना दिली नाही. यावरुन स्पष्ट होते की, मंडळाच्या साईटवरील अभियंत्यानी जाणुन बुजुन ठेकेदाराशी संगनमत करुन उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केली नाही. म्हणून संबंधीत अभियंता यांचेवर कठोर कार्यवाही करण्यंत यावी. याबाबत मा. सभापती यांनी सांगितले की मंडळाचे सदस्य यांनी साईटवर सुचविल्यानुसारही बांधकाम साहित्याचे नमुने घेऊन त्याची तपासणी न करणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी. याबाबत श्री. पांडे,कार्यकारी अभियंता औरंगाबाद यांनी सांगितले की, याबाबतचा सविस्तर अहवाल आगामी बैठकीत सादर करण्यात येईल.

७. मा. सभापती यांनी सुचना दिल्या की, वॅम्बे योजनेबाबत जिल्हा स्तरीय बैठकीत मंडळाचे त्या त्या जिल्हयाचे मा. सदस्य यांना बोलविण्यांत यावे म्हणून मंडळाचे वतीने जिल्हाधिकारी / महानगरपालिकेचे आयुक्त यांना मंडळाचे वतीने पत्र पाठवावे.मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, उपरोक्त प्रमाणे मा. सभापती यांचे सूचनानुसार पत्र पाठविण्यांत येईल.

८. मुख्य अधिकारी यांनी बैठकीत मंडळास माहिती दिली की, वॅम्बे योजने अंतर्गत घरे बांधणेसाठी योजना जास्तीत जास्त प्रमाणात राबविणेसाठी मंडळाचे सर्व मा. सदस्य यांनी मंडळाचे जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांना सहकार्य करुन त्यासाठी जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त / नगर परिषदेचे मुख्य अधिकारी यांचेशी समन्वय साधुन योजनेचे प्रस्ताव त्यांचेकडुन प्राप्त होणेसाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. मा. सभापती यांनीही सूचना केली की, नांदेड,परभणी व जालना येथेही वॅम्बे योजनेची अंमलबजावणी होणेसाठी मंडळाचे अधिकारी यांनी मंडळाचे मा. सदस्य यांचे सहकार्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे.मा.मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, पुणे मंडळात वॅम्बे योजनेचे काम मोठया प्रमाणात झाले आहे व तेथील कामेही चांगली झाली आहेत. याबाबत मंडळाचे मा. सभापती व सर्व मा. सदस्य यांनी प्रतिपादन केले की, पुणे येथील वॅम्बे योजनेचे काम पहाण्यासाठी मुख्य अधिकारी यांनी एक दौऱ्याचा कार्यक्रम आखुन त्याप्रमाणे पुणे येथे गेल्यास तेथील कामाची अधिक माहिती मंडळाचे मा. सदस्यांनाही मिळेल. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की,मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,म्हाडा मुंबई यांचे संमतीने पुणे येथे वॅम्बेची कामे पहाण्यासाठी, जाण्याची तारीख निश्चीत करुन त्याप्रमाणे मा. सभापती व मा. सदस्य यांना कळविण्यांत येईल.

शेवटी सर्व उपस्थिताचे आभार मानुन बैठक समाप्त झाली.